# अंतर्गत तक्रार निवारण समिती अहवाल

## कार्यशाळा:–" कामाच्या बाबतीत स्त्री– पुरूष समानता"

अभिव्यक्ती या स्त्रीयांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या एनजीओच्या सहयोगाने गुरूवार दि.२७/७/२०१७ रोजी सकाळी ९.३० ते ११.०० या वेळेत'Gender Equality at the Work', कामाच्या बाबतीत स्त्री–पुरूष समानता या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यशाळेचे प्रास्ताविक अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रमुख प्रा.अपेक्षा जाधव यांनी केली. विद्यार्थीनींना महाविद्यालयात सुरक्षित वाटले पाहिजे यासाठी समिती कोणत्या प्रकारचे काम करते, सहकार्य करते याची माहिती त्यांनी दिली. समिती वर्षभर कोणत्या स्वरूपाचे उपक्रम राबवणार आहे याचा आढावा घेतला.

अभिव्यक्तीच्या कार्यकर्त्या पुनमताई आणि कल्याणीताई यांनी दोन छोटया फिल्म दाखवल्या त्याआधारे विद्यार्थीनींशी संवाद साधला. केवळ मुलगी आहे म्हणून घरात कौटुंबिक समारंभात समाजात कामाच्या ठिकाणी भेदभाव केला जातो. तो कशा प्रकारे होतो , काही काम पुरूषांनीच करायची तर काही स्त्रीयांनीच असा भेद का ? या मागची कारणे चर्चेच्या वेळी मांडण्यात आली.

याप्रसंगी विद्यार्थिनींनी आपली मते मोकळेपणे मांडली. गावाकडे रस्त्याने चालताना खाली मान घालून चालावे लागते. मोठयाने हसता येत नाही. लहान भाऊपण कामाच्या बाबतील रूबाब करतात. त्याचा त्रास होतोच मुख्य म्हणजे बाई आणि पुरूष यातून माणूसपण गायब झाले आहे. या प्रश्नातून मार्ग काढण्यासाठी एकत्र येणे, भगिनीभाव निर्माण करण्याची गरज आहे अशी मते मांडण्यात आली.

जग खूप सुंदर आहे ते अनुभवता आले पाहिजे. त्यासाठी बाहेर पडा तशी हिमंत दाखवा असा सल्ला पुनमताईने दिला. कार्यक्रमाचे आभार डॉ.रूपाली शेंडकर यांनी मानले. प्रा.स्वाती शिंदे, प्रा.दिपश्री पोखलेकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सदर कार्यक्रम मा. प्रभारी प्राचार्य डॉ.एम.आर.अवघडे यांच्या पाठिंब्यामुळे घेता आला . त्यांचे मन:पूर्वक आभार.

## पथनाटयाचे आयोजन

दिनांक–२९ सप्टेंबर २०१७ रोजी लोकायत या सामाजिक सेवा करणाऱ्या (एन.जी.ओ) संस्थेच्या वतीने राज्यघटनेविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी तसेच लिंगभाव संवेदनशीलता वाढावी यासाठी पथनाटय सादर करण्यात आले. राज्यघटनेतील महत्वाच्या कामाची माहिती नाटयरूपातून विद्यार्थ्यांपुढे सादर करण्यात आली. या कार्यक्रमासाठी मा.प्राचार्या डॉ.सुषमा भोसले यांनी प्रोत्साहन दिले आणि लोकायतच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाचे आयोजन प्रा.ए.पी.जाधव यांनी प्रा.डॉ.रूपाली शेंडकर आणि प्रा.स्वाती शिंदे यांच्या सहकार्याने केले.

## घरगुती हिंसाचार व प्रतिबंध कार्यशाळा:–

आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या सहयोगाने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महिला दक्षता समितीच्या अध्यक्षा सौ.रूपाली चाकणकर यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. त्यांनी महिलांवर होणाऱ्या अत्याचाऱ्यांच्या संदर्भात प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात मार्गदर्शन केले. वास्तव घटनांच्या आधारे महिलांनी काय दक्षता घ्यावी हे समजून सांगितले. डॉ.मिलींद भोई यांनी घरगुती हिंसाचार व्यसनामुळे कसा वाढत चालला आहे याचा आढावा घेतला. शेरो–शायरीच्या खुमासदार मांडणीतून व्यसनमुक्ती आणि घरगुती हिंसाचार कसा कमी करता येईल याचे मार्गदर्शन केले. ॲड. औदुंबर खुने पाटील आणि डॉ.निलिमा वर्तक यांनी घरगुती हिंसाचार संदर्भात कायद्यातील विविध तरतुदी सांगितल्या तसेच विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ.सुषमा भोसले यांनी या संदर्भात महाविद्यालयात समुदपदेशन विभाग कार्यरत केला जाईल असे आश्वासन दिले. मान्यवरांचे स्वागत उपप्राचार्य डॉ.महेंद्र अवघडे यांनी केले. या कार्यशाळेचे संपूर्ण आयोजन डॉ.रूपाली शेंडकर यांनी प्रा.स्वाती शिंदे, डॉ.विजय बालघरे व डॉ.अपर्णा साबणे यांच्या सहकार्याने केले.

## कार्यशाळा: '' माझी आई माझ्या महाविद्यालयात''

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाच्या सहयोगाने महाविद्यालयातील तक्रार निवारण समितीच्या वतीने शुक्रवार दि. १९/१/२०१८ रोजी '' माझी आई माझ्या महाविद्यालयात '' ही कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यशाळेची सुरूवात महाविद्यालयातील डान्सच्या ॲडऑन कोर्सच्या विद्यार्थ्यांनी गणेश वंदना सादर करून केली. विविध फॉर्मेशन्सच्या आधारे अतिशय लयदार पध्दतीने आकर्षक नृत्याविष्कार सुरज साठे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सादर केला.

मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापुजन आणि दिपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.प्राचार्या डॉ.सुषमा भोसले यांनी केले. पालक– विद्यार्थी संवादाची गरज स्पष्ट करून महाविद्यालयातील विविध योजनांचा आढावा त्यांनी घेतला.

कार्यशाळेचे उद्‌घाटक आणि प्रमुख वक्त्या मा.सौ.मिनलताई सासणे यांनी आपल्या आईने म्हणजे शारदाबाईंनी किती प्रतिकूलतेतून त्यांना आणि इतर भावंडाना कसे घडविले हे अनेक उदाहरणातून कथन केले. मुलांना घडविण्यात आई– वडिलांच्या संस्काराचा भाग मोठा आणि महत्वाचा असतो. जी मुले आई–वडील, गुरू, पुस्तके यांच्या सहवासात राहतात ती संस्कारीत होतात. जबाबदाऱ्या विश्वासाने मुलांवर टाकल्यास ती व्यवहार चतुर होतात. कुंटुंबातील वातावरण बिघडणार नाही ही सगळयांचीच जबाबदारी आहे असे उपयुक्त विचार मांडून मा.मिनलताईंनी पालकांच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध या महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.मंजुश्री बोबडे यांनी ' **स्त्रियांची आर्थिक साक्षरता** ' या विषयावर अतिशय परिणामकारक आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या त्यांना आलेल्या अनुभवातून आर्थिक साक्षरतेचा मुद्दा प्रभावीपणे खुलवला. विद्यार्थिनी आणि

त्यांची आई अशा दोन पिढयांनी एकमेकींना समजून घेणे किती महत्वाचे आहे, आक्रमकतेने प्रश्न सुटणार नाहीत, शिक्षण धाडसाने येते, आत्मविश्वास येतो, पाया पक्का होते पण फाजील आत्मविश्वास आणि उर्मटपणा नसावा. पालकांनीही १८ ते २१ या वयोगटातील मुलांना वाढवताना काळजी घ्यावी. संवदेनशीलता ठेवावी असे मार्गदर्शन डॉ.बोबडे यांनी केले.

अंधश्रध्दा निर्मुलन समितीच्या पुणे विभागाच्या प्रमुख कार्यकर्त्या श्रीमत नलिनी जाधव यांनी श्रध्दा–अंधश्रध्दा यातील फरक सांगून अनके प्रात्यक्षिकांच्या आधारे बुवाबाजी करणारेए लोकांना कसे फसवतात हे त्यांनी दाखवले. मुलींना शब्दात अडकवून कसे फसवले जाते हे सांगून त्यांनी काय दक्षता घ्यावी हे प्रभावीपणे कथन केले.

सामाजिक कार्यकर्त्या मेघना झुझम यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर आधारित एक तासाचा एकपात्री प्रयोग सादर केला. सावित्रीबाईचा जीवनपट अत्यंत रंजकतेने, प्रभावीपणे आपल्या अभिनयातून त्यांनी जीवंत केला.

उपस्थित महिला पालकांची आरोग्य तपासणी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या आकुर्डी येथील आयुर्वेद महाविद्यालयाच्या डॉक्टराच्या टीमने केली. त्या टीमच्या वतीने डॉ.पोर्णिमा डावरे यांनी अहवाल सादर केला. त्यात फक्त दोन महिला वगळता सर्वांचे हिमोग्लोबीन अतिशय कमी आहे इतरही तब्येतीच्या तक्रारी आहेत असे सांगून एच.बी वाढविण्यासाठी सर्व महिंलाना गोळया दिल्या आणि या महिलांच्या आरोग्याचा सातत्याने आढावा घेण्यासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमात उपस्थित महिलांची आर्थिक साक्षरता आजमवण्यासाठी एक प्रश्नावली भरून घेण्यात आली. एकूण ५० महिलांपैकी ३ महिला पदवीधर होत्या. १२– निरक्षर तर १० वी च्या आत शिक्षण घेतलेल्या सुमारे २३ महिला होत्या. ५० पैकी ४५ महिला घरकाम करणाऱ्या होत्या. मिळालेल्या उत्पन्नातून बचतगट आणि बँकेत बचत ठेवणाऱ्यांचे प्रमाण जास्त होते. १६ महिला स्वत:साठी काहीही खर्च करू शकत नव्हत्या. जवळजवळ ५०% महिलांना थोडया प्रमाणात कुंटुंबाची मदत कामामध्ये होते. ८०% महिलांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य होते.

याच कार्यक्रमात प्रॉक्टर ॲन्ड गॅम्बल कंपनीच्यावतीने विद्यार्थीनींना मोफत केशतेल आणि सॅनेटरी नॅपकिन्सचे वाटप करण्यात आले.

उपस्थित सर्व महिलांना हळदीकुंकू, तिळगुळ देण्यात आले तसेच भोजन देण्यात आले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.रूपा शेंडकर यांनी केले. विद्यार्थीनींनी पाहुण्यांचा परिचर करून दिला तर आभार कार्यक्रमाच्या संयोजिका प्रा.अपेक्षा जाधव यांनी मानले. या कार्यक्रमास प्रा.स्वाती शिंदे, प्रा.पुजा गायकवाड, प्रा.हरिदास खेसे, प्रा.पोखलेकर, प्रा.पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले.

प्रा.अपेक्षा जाधव